Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ३ ] शनिवार, डिसेंबर २७, २०२५/पौष ६, शके १९४७ [पृष्ठे ३ किंमत : रुपये १५.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहे.**

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

**संकीर्ण अधिसूचना : नेमणूका इ. इ. केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.**

भाग १-(असा.) (अ.वि.पु.) म.शा.रा., अ. क्र. ८.

### उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम ११ खालील प्रारंभीक अधिसूचना**

क्रमांक-शिरस्तेदार-भू.सं.-कलम११-कावि-९२१-२०२५.—

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्रक्र./७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समूचीत शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस या सोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसूचीत करण्यात येते की, उक्त जमीनीची सार्वजनीक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची आवश्यकता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापित होत असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत.)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची- चार मध्ये दिलेला आहे,

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता असे घोषीत करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यांसमोर विशेष परिस्थीतीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदींच्या प्रवर्तनातून विशेष सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुःस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त नियम” असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भूमी अभीलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेले जिल्हाधिकारी, यांनी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मोर्शी यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०३-४७-२०२४-२५. मौजा सहादापुर, तालुका मोर्शी, जिल्हा अमरावती

| चालता क्रमांक | गट नं./स.नं. | एकूण क्षेत्र | संपादित करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | हे. आर | हे. आर |
| १ | १७/१ | १ ९८ | १ ९८ |
| २ | १७/१अ | १ ९९ | १ ९९ |
| ३ | १७/२ | १ ४१ | १ ४१ |
| ४ | १७/३ | १ ४१ | १ ४१ |
| ५ | १७/४ | १ ३९ | १ ३९ |
| ६ | १७/५ | १ ६२ | १ ६२ |
| ७ | १७/६ | १ ६२ | १ ६२ |
| ८ | १६/५पै. | ० ८१ | ० ८१ |
| ९ | १६/५पै. | ० ८१ | ० ८१ |
| १० | १६/४ | १ ०१ | १ ०१ |
| ११ | १६/३ | १ ०१ | १ ०१ |
| १२ | १६/१ | २ ०२ | २ ०२ |
| १३ | १६/२ | १ १५ | १ १५ |
| १४ | १६/३ | ३ ५८ | ३ ५८ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :- | मराठी भाषा विद्यापीठ. |
| प्रकल्प कार्याचे विवरण | :- | मराठी भाषा विद्यापीठाचे कामाकरीता. |
| भूसंपादन प्रकरण क्रमांक | :- | ०३-४७-२०२४-२५. मौजा सहादापुर, तालुका मोर्शी. |
| समाजाला मिळणारे लाभ | :- | या प्रकल्पाद्वारे शैक्षणिक फायदा होणार असून क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक फायदा होणार आहे. |

**अनुसूची-तीन**

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणरी कारणे :- विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहीती —निरंक—.

**अनुसूची-चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) :- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-अ, दिनांक १३ मार्च, २०१५ उक्त अधिनियमाचे प्रकरण II व III मधील तरतुदी लागू करण्यापासून सुट प्राप्त.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकांचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| (अ) | प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | –: आवश्यकता नाही सबब माहिती निरंक |
| (ब) | प्रशासकाचा कार्यालयाचा पत्ता | –: निरंक :– |
| (क) | ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील | –: निरंक :– |

**टीप :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मोर्शी यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**प्रदीपकुमार पवार,**
उपविभागीय अधिकारी तथा,
भुसंपादन अधिकारी, मोर्शी

मोर्शी :
दिनांक १६ सप्टेंबर, २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.